देशोन्नति दि. 24/10/2024

# स्थागुशाच्या कारवाईत घरफोडीतील आरोपी अटकेत



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ भाग्यनगर व शिवाजीनगर हद्दीत घरफोडी करून फरार असलेल्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून त्याच्याकडून सोन्याचे दागिने, लॅपटॉप व इतर साहित्य असा एकूण २ लाख ६३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जिल्ह्यात घडत असलेल्या गुन्ह्यांना आळा बसणेकामी व माली गुन्हे उघडकीस आणून गुन्हेगारांना अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर यांना आदेशीत केले होते. त्यानुसार त्यांनी मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पथके तयार करुन सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने माली गुन्ह्यासंबंधाने माहिती घेत असतांना स्थानिक गुन्हे शाखेतील पथकातील अधिकारी यांना नांद्रेड शहरात घरफोडी केलेला आरोपी राजू ऊर्फ कॅली हा तेहरा नगर येथे आल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा लावून मिळालेल्या माहितीप्रमाणे सदर इसमाचा शोध घेवून गुन्ह्यातील इसम राजू ऊर्फ कॅली वाघमारे (२५), रा. तेहरानगर, नांदेड यास ताब्यात घेवून त्यास विचारपुस केली असता त्याने भाग्यनगर व शिवाजीनगर हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली. सदर आरोपीकडून तीन तोळे सोन्याचे दागिने, एक लॅपटॉप, एक आयपॅड, एक टॅब व दोन हार्डडीस्क असा एकूण २ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमूद आरोपीस पुढील तपासकामी भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. सदर कारवाई पथकात सपोनि रवि वाहुळे, पांडूरंग माने, पोउपनि दत्तात्रय काळे, आशिष बोराटे, सचिन सोनवणे, सपोउपनि माधव केंद्रे, पोहेकॉ गुंडेराव करले, अफजल पठाण, शेख मोहसीन यांच्यासह आदी कर्मचारी सहभागी झाले होते.

CMYK

पुण्यनगरी दि. 24/10/2023

# नांदेड येथे घरफोडीचे तीन गुन्हे उघडकीस

**नांदेड :** भाग्यनगर व शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोउी केलेल्या एका २५ वर्षीय चोरट्याला स्थागुशाच्या पथकाने जेरबंद केले असून त्याच्याकडून सुमारे २ लाख ६३ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकाऱ्यांना नांदेड शहरात घरफोडी केलेला आरोपी राजू ऊर्फ कॅली (२५, तेहरा नगर, नांदेड) येथे आल्याची गुप्त माहिती मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदारांनी सापळा लावून राजू ऊर्फ कॅली वाघमारे यास ताब्यात घेवून विचारपुस केली. त्याने घरफोडीच्या तीन गुन्ह्यांची कबुली दिली.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत २९९/२३ व ३००/२३ असे दोन व शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १५३/२३ एक अशा तीन गुन्हे केल्याचे सांगितले.त्याच्याकडून या गुन्ह्यातील



मुद्देमाल ३ तोळे सोन्याचे दागीने, एक लॅपटॉप, एक ॲपल कंपनीचा आयपॅड, एक टॅबव दोन हार्ड डिस्क असा एकुण २ लाख ६३ हजारांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. सदर पथकाचे पोलीस अधीक्षक यांनी कौतुक केले आहे.